# खोट्या जाहिरातीबाबत खुलासा

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांच्या अंतर्गत विविध पदांच्या पदभरती साठी www.egrampanchayat.com या संकेतस्थळावर खोटी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

यासंदर्भात नमूद करण्यात येते की, वरील जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे कोणतीही पदे भरण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही. राज्यस्तरीय सरळसेवा निवडसमिती अशाप्रकारची कोणतीही समिती ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त कार्यरत नाही आणि प्रकल्प व्यवस्थापक, ई-ग्रामपंचायत असे कोणतेही पद अस्तित्वात नाही. ही जाहिरात पुर्णतः खोटी असून त्या माध्यमातून राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांची दिशाभूल करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक घोटाळा करण्याचा प्रयत्न या जाहिरातीच्या माध्यमातून दिसून येतो. सदर खोटी जाहिरात देणाऱ्याविरुद्ध शासनाच्या वतीने पोलिसात तात्काळ गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत असून सदर खोट्या जाहिरातीस कोणीही बळी पडू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

---------------------